# लालपरीची चाके थांबली

## प्रवाशांचे हाल : सरकारवर आरोप करत कर्मचाऱ्यांचा संप



### बारामतीत ४५० कर्मचारी आंदोलनात

**बारामती, दि. ३ (प्रतिनिधी)** - एसटी कामगार संयुक्त कृती समितीच्या वतीने प्रलंबित मागण्या मान्य न झाल्याने मंगळवारी (दि. ३) पासून बेमुदत धरणे आंदोलन सुरु केल्यावर यामध्ये बारामती आगारातील सर्व कर्मचारी कामबंद आंदोलनात सहभागी झाले. एसटी कर्मचार्यांनी कामबंद आंदोलन केल्यावर लालपरीची चाके थांबली.

बारामती आगारातील चालक, वाहक, क्लार्क व यांत्रिक कामगार असे जवळपास ४५० कर्मचारी या आंदोलनात सहभागी झाल्याने मंगळवारी बारामती आगारातील सर्व बसेसच्या फेर्या रद्द करण्यात आल्या. एसटी कामगारांच्या आर्थिक व महत्त्वाच्या प्रश्नांची सोडवणूक होत नसल्याने एस. टी. महामंडळातील बहुतांशी संघटनांची संयुक्त कृती समिती स्थापन करण्यात आली आहे.

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३** - महाराष्ट्र राज्य रस्ते वाहतूक महामंडळाच्या (एमएसआरटीसी) कर्मचार्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी मंगळवार (दि.३) पासून राज्यव्यापी संप पुकारला. त्याचा फटका पुणे विभागालाही बसला. त्यामुळे पुणे विभागातील स्वारगेट, शिवाजीनगर (वाकडेवाडी) आणि पुणे स्टेशन या बसस्थानकातून नियमितपणे सुटणाऱ्यांपैकी निम्म्यापेक्षा कमी बसेस धावत होत्या. परिणामी, प्रवाशांना तासन् तास बसची वाट पाहावी लागली. त्यामुळे त्यांचे हाल झाले.

एसटी कामगारांच्या विविध प्रश्नांची सोडवणूक अनेक वर्षांपासून रखडली आहे. आंदोलने करुनही सरकारचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत या कर्मचाऱ्यांनी अखेर संपाचे हत्यार उपसले. यात राज्यातील जवळपास अकरापेक्षा अधिक कामगार संघटनांनी सहभाग नोंदवला. या कर्मचाऱ्यांनी एकत्र येत मंगळवारपासून पुणे विभागातील सर्वच एसटी स्थानकांत धरणे आंदोलन केले. या स्थितीचा फायदा घेत खासगी वाहनचालकांनी दुप्पट-तिप्पट भाडेवाढ केली आहे. त्यामुळे प्रवाशांची अक्षरशः लूट सुरू असल्याचे दिसून आले.

#### ७० टक्के कर्मचारी संपात

वाकडेवाडी बसस्थानकातून दररोज २६० बसेस नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर मार्गावर धावतात. पण, संपामुळे मंगळवारी सकाळपासून दुपारी ३ वाजेपर्यंत ८३ बस मार्गस्थ झाल्या. ७० टक्के कर्मचारी संपात सहभागी झाल्यामुळे इतर बसेस आगारातच उभ्या होत्या, अशी माहिती वाकडेवाडी बसस्थानक आगारप्रमुख ज्ञानेश्वर रणवरे यांनी दिली.

### तळेगाव डेपोजवळ धरणे

**तळेगाव दाभाडे, दि. ३ (वार्ताहर)** - महाराष्ट्र एस टी संयुक्त कृती समिती कडून एस टी कामगारांच्या विविध मागण्यासाठी येथील तळेगाव डेपोच्या गेट जवळ बेमुदत धरणे आंदोलन दि.३ सप्टेंबर पासून सुरु करण्यता आले.

यामध्ये महाराष्ट्र एस टी संयुक्त कृती समितीकडून गेल्या दीड वर्षापासून महाराष्ट्र एस टी कामगारांच्या पगारवाढीसाठी प्रयत्न करण्यात येत आहे. परंतु सरकार याबाबत चालढकल करत आहे.ऑगस्ट महिन्यात कृती समिती बरोबर मीटिंग घेतली व नंतर दिनांक २०/८/२४ रोजी पुन्हा मीटिंग घेण्याचे पत्र पण कृती समितीला दिले. परंतु मीटिंग घेतली नाही व कसलाही तोडगा काढला नाही.त्यामुळे येथील सर्व कामगारांनी दिनांक ३/९/२४ पासून तळेगाव डेपोच्या गेट जवळ बेमुदत धरणे आंदोलन करण्याचे ठरवले असल्याचे कृती समितीकडून सांगण्यात आले.

### सासवड आगार ठप्प

**सासवड, दि. ३ (प्रतिनिधी)** - महाराष्ट्र राज्य एसटी कामगार संघटनांनी पुकारलेल्या संपाला सासवड आगारातून १०० टक्के प्रतिसाद मिळत असून पुरंदर तालुक्यातील ग्रामीण भागातील एसटी सेवा ग्रामीण भागातील नागरिकांचे प्रचंड हाल पहावयास मिळाले त्याचबरोबर शालेय विद्यार्थी ताटकळत उभे असल्याचे चित्र पाहावयास मिळत होते. कर्मचाऱ्यांना सातवा वेतन अयोगासह राज्य सरकारी कर्मचार्यांप्रमाणे वेतनासाठी एसटी कर्मचार्यांनी मंगळवार सकाळपासून आंदोलन सुरु केले आहे. या आंदोलनामुळे सासवड एसटी आगार बंद आहेत.यामुळे एसटीच्या वाहतुकीला तालुक्यात फटका बसल्ल्याने प्रवाशाचे हाल होत आहेत. ११ कामगार संघटनांच्या कृती समितीने पुकारलेल्या आंदोलनामुळे जादा वाहतुकीला फटका बसला आहे.



### मंचर आगाराची सेवा थांबली!

**मंचर, दि. ३ (प्रतिनिधी)** - एसटी कर्मचाऱ्यांनी राज्यव्यापी पुकारलेल्या संपाला पाठिंबा म्हणून मंचर एसटी आगार कर्मचाऱ्यांनी राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी प्रलंबित मागण्यांबाबत घोषणाबाजी मंगळवारी (दि. ३) केली. कर्मचारी बेमुदत संपावर गेले असून एसटी सेवा ठप्प झाली आहे, अशी माहिती संयुक्त कृती समितीचे अध्यक्ष रामचंद्र गेगजे, सचिव मोहम्मद सलील सय्यद यांनी दिली.

एसटी महामंडळाचे मंचर आगाराचे वाहक राजू बन्सी आणि संघटनेचे सचिव मोहम्मद सलील सय्यद यांनी एसटी कर्मचाऱ्याच्या प्रमुख मागण्या सांगितले की, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सरकारने सातवा वेतन आयोग एसटी कर्मचाऱ्यांना लागू करावा. महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व वेतनवाढीच्या दराची थकबाकी त्वरित अदा करा.४८४९ कोटी रुपये मधील उर्वरित रक्कम त्वरित अदा करा. मुळवेतनात दिलेल्या ५ हजार रुपये, ४ हजार रुपये ,२ हजार ५०० रुपयांमुळे झालेल्या विसंगती दूर करण्यासाठी सरसकट ५ हजार रुपये द्या.एस.टी. कर्मचारी व कुटुंबियांना कॅशलेस वैद्यकीय सुविधा (इनडोअर व आऊटडोअर) त्वरित सुरू करा.सुधारित जुल्मी शिस्त व आवेदन कार्यपद्धतीमध्ये त्वरित बदल करा.विद्यमान एस.टी. कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांना तसेच सेवानिवृतांना व त्यांच्या पत्नीस सर्व प्रकारच्या बसेसमध्ये फरक न भरता वर्षभराचा मोफत पास द्यावा आदी मागण्यासाठी एसटी कर्मचारी संपावर गेल्यावर एसटी वाहतूक सेवा ठप्प झाली आहे.



### नारायणगाव आगाराच्या ४४ बसेस रस्त्यावर

**नारायणगाव, दि. ३ (वार्ताहर)** - एसटी महामंडळाच्या संघटनांनी पुकारलेल्या बंदला नारायणगाव आगारात फारसा प्रतिसाद मिळाला नसल्याचे दिसून आले.नारायणगाव आगारातील ३०७ कर्मचार्यांपैकी अवघे १८ चालक तर १३ वाहक असे ३१ कर्मचारी संपात सहभागी झाले आहेत. त्यामुळे बस वाहतुकीवर मोठा परिणाम झाला नाही. नारायणगाव डेपोतून मंगळवारी (दि. ३) ४४ एसटी बस रस्त्यावर धावल्या तर १६ बस मुंबई व कोकणात रवाना झाल्या आहेत. नारायणगाव जुन्नर, जुन्नर ओतूर, उंब्रज ओतूर अशा प्रकारच्या १३ शटल बस सेवा तर १५ ग्रामीण मुक्कामी बस चालू ठेवण्यात नारायणगाव आगाराला यश आले असल्याची माहिती आगार प्रमुख वसंत आरगडे यांनी दिली.

ग्रामीण भागात विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी ग्रामीण भागातील बस सेवा सुरळीत ठेवण्यात आली. नारायणगाव आगाराची सकाळी कोलमडलेली बससेवा सकाळी आठ वाजेपासून सुरळीत करण्यात आली असून लांब पल्ल्याच्या काही गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. पहाटे पाच वाजता सुटणारी बार्शी व जुन्नर पुणे संगमनेर स्वारगेट एसटी बस आंदोलनामुळे पुण्यातून मुंबईच्या दिशेने वळवण्यात आल्या

नारायणगाव आगारात एकूण ६८ एसटी बस आहेत. त्यापैकी ग्रामीण भागात २४ तर शहरी भागात १५ असे एकूण ३८ मुक्कामी बस सेवा चालवली जाते. नारायणगाव आगारातील दररोज २३० कर्मचारी दिवसभरात एसटी बस २० हजार किलोमीटरचा प्रवास पूर्ण करून ३० हजार प्रवाशांची वाहतूक करीत असतात. त्यातून नारायणगाव आगाराला सहा लाखांचे उत्पन्न मिळते.

#### आगारप्रमुखांना रीतसर पत्र

आंदोलनात सहभागी झालेल्या कर्मचार्यांनी आगार प्रमुखांना रीतसर पत्र दिले होते. परंतु अत्यावश्यक सेवा असल्याने आंदोलनात सहभागी होता येणार नाही अशा प्रकारे आंदोलनात सहभागी होणार्या कर्मचार्यांना कळविण्यात आले होते. नारायणगाव आगारात प्रशासकीय व कार्यशाळेतील कर्मचारी आंदोलनात सहभागी नसून चालक व वाहक आंदोलनात सहभागी झालेले आहेत.

## थेऊरमध्ये कार-डंपरचा भीषण अपघात

### विक्रीकर अधिकाऱ्यासह त्यांच्या वडिलांचा मृत्यू

**लोणी काळभोर, दि. ३ (वार्ताहर)** - थेऊर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील गणेशवाडी एचपी पेट्रोल पंपाजवळ, अष्टविनायक मार्गावर कार व डंपरचा भीषण अपघात होऊन विक्रीकर अधिकाऱ्यासह त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाल्याप्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुरेश प्रभाकर पवार (वय ६२, रा. बकोरी फाटा, वाघोली) व अभिजीत सुरेश पवार (वय ३६) असे मृत्यू झालेल्या पितापुत्रांची नावे आहेत. तर संदेश लक्ष्मणराव पवार (वय ३३, रा वाघोली) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या वाहनचालकाचे नाव आहे. याप्रकरणी सुरेश पवार यांचा लहान मुलगा अनिकेत सुरेश पवार (रा. भानगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

अनिकेत पवार यांचे भाऊ अभिजीत पवार हे विक्रीकर निरीक्षक पदावर कार्यरत होते. अभिजीत पवार हे त्यांच्या कुटुंबासोबत अष्टविनायक मार्गावरून कारने चालले होते. त्यावेळी गाडीत दहा वर्षांचा मुलगा, दोन महिला आणि दोन पुरुष होते. थेऊरकडून थेऊर फाट्याकडे जात असताना, गणेशवाडी एच पी पेट्रोल पंपाजवळ त्यांची कार आली असता, त्यांच्या कारला समोरून येणार्या डंपरने जोरदार धडक दिली. या अपघातात अभिजीत पवार व त्यांचे वडील सुरेश पवार हे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी लोणी काळभोर येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र अभिजीत पवार यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे तेथील डॉक्टरांनी घोषित केले. तर सुरेश पवार यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

## हांडेवाडीत अज्ञाताने चार गाड्या पेटवल्या

**लोणी काळभोर, दि. ३ (वार्ताहर)** - ज्वलनशील पदार्थाच्या सहाय्याने अज्ञात व्यक्तीने ४ चारचाकी गाड्या पेटवून दिल्याची घटना हांडेवाडी (ता. हवेली) येथील शेवाळवाडी फाटा परिसरातील नॅशनल स्क्रैप सेंटर दुकानाच्या समोर पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली आहे. या घटनेत २ लाख ७५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

याप्रकरणी श्रीपाल रमणिकलाल शहा (रा. हांडेवाडी, ता. हवेली) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. श्रीपाल शहा यांचे हांडेवाडी येथील सर्व्हे नं ४३/०३ मध्ये नॅशनल स्क्रॅप सेंटर नावाचे दुकान आहे. पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास त्यांच्या दुकानाच्या समोर पार्क केलेल्या २ गाड्यांना अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे नुकसान व्हावे या उद्देशाने ज्वलनशील पदार्थाच्या सहाय्याने आग लावली. या आगीमध्ये आणखीन २ गाड्याही जळाल्या. या आगीत ४ चारचाकी गाडयांचे सुमारे २ लाख ७५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

## जेजुरी बाजारातील असुविधा दूर करू - इंगोले



**जेजुरी, दि. ३ (वार्ताहर)** - जेजुरी बाजारतळामध्ये कचरा संकलित करण्यासाठी कायमस्वरूपी एक ट्रॉली उभी करण्यात येणार आहे. बाजारचे असुविधा निर्माण होणार नाहीत याची दक्षता घेतली जाईल. स्वच्छतागृहांची दुरुस्ती केली जाईल, आवश्यक तेथे मुरुमीकरण करून पटांगणातील गवत साफ करून धुरळणी, फवारणी नियमित करण्यात येईल. लवकरच बाजारओटे वितरित करण्यात येतील, असे लेखी आश्वासन जेजुरी पालिकेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगोले यांनी कार्यकर्त्यांना दिले आहे.

गेली काही महिन्यांपासून जेजुरी बाजारतळामध्ये प्रचंड असुविधांचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत आहे. याबाबत नगरपालिकेला ठिय्या आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. यामध्ये शेतकऱ्यांकडून केला जाणारा बाजार कर रद्द करण्यात यावा. शेतमाल विकणाऱ्या व्यापारी असो वा शेतकरी त्यांना सोयीसुविधा मिळाव्यात अन्यथा आंदोलन करणार असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले होते. याबाबत नगरपालिका कार्यालयात मंगळवारी (दि. ३) झालेल्या बैठकीत संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष संदीप जगताप, मनसे तालुकाप्रमुख उमेश जगताप, अनिता नरोडे, तानाजी काळाणे, सागर खोमणे, सुहास खोमणे, सचिन शिंदे, सलीम तांबोळी, गोरख रोमण आदी उपस्थित होते. यावेळी मुख्याधिकारी इंगोले यांनी चार दिवसांत असुविधाचे निवारण करण्यात येणार असून ठिय्या आंदोलन करू नये, असे लेखी आश्वासन दिले.





## निंबूतमध्ये रंगला ऑफ रोड वारीचा थरार

### चारचाकी चालकांचे चित्तथरारक स्टंट : सुमारे ५७ स्पर्धकांचा सहभाग

**सोमेश्वरनगर, दि. ३ (वार्ताहर)** - निंबुत-गडदरवाडी (ता. बारामती) येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त ऑफरोड वारी या चित्तथरारक स्पर्धेला प्रचंड प्रतिसाद मिळाला. सोमेश्वर साखर कारखान्याचे संचालक अभिजित काकडे यांच्या संकल्पनेतून ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

ग्रामीण भागात सलग दुसर्या वर्षी ही ऑफरोड वारी पाहण्यासाठी तरुणांनी उच्चांकी गर्दी केली होती. स्पर्धेतील हृदयाचा ठोका चुकवणारे स्टंट पाहून अनेकांचा थरकाप उडाला. दिवसभरात हजारो प्रेक्षकांनी या खेळाचा आनंद लुटत स्पर्धकांना प्रोत्साहन दिले. विविध गटातील स्पर्धकांना यावेळी रोख बक्षीस आणि पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती प्रमोद काकडे, माळेगावचे अध्यक्ष केशवराव जगताप, सोमेश्वर कारखान्याचे संचालक राजवर्धन शिंदे, दिलीप फरांदे उद्योजक आर. एन. शिंदे, दीपक साखरे, मदन काकडे यांच्या उपस्थितीत काकडे महाविद्यालयात स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला.

स्पर्धेत चारचाकी वाहनांसह सुमारे ५७ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेत महाराष्ट्रसह कर्नाटकातील स्पर्धक सहभागी झाले होते. या स्पर्धेत वापरल्या जाणार्या गाड्या फक्त स्पर्धे साठी न वापरता त्या आपत्ती व्यवस्थापनातही मदत करतात. नुकत्याच वायनाड येथे आलेल्या पुरामध्ये अशाच प्रकारच्या गाड्यांचा वापर बचाव कार्यात करण्यात आला होता. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र जय पवार यांनीही ऑफरोड वारीचा आनंद लुटला. महिला स्पर्धकही यामध्ये सहभागी झाल्या होत्या. विजेत्या ३६ स्पर्धकांना यामध्ये बक्षीस देण्यात आले. जय पवार यांनी सुद्धा या स्पर्धेचा आनंद घेतला . या स्पर्धेचेआयोजन अभिजीत काकडे, अभिजीत धुमाळ, संकेत जगताप, दीपक येवले, पृथ्वी शिंदे, ऋषिकेश धुमाळ, नेवसे सर, येळे सर, प्रणव डोंगरकर, कुंदे सर, ऐश्वर्या धुमाळ, विकी बनसोडे, शिवाजी गडदरे, धनंजय गडदरे, बापू गडदरे आदी आणि अभिजीत काकडे युथ फाऊंडेशन नींबूत व टॉर्क ४ बाय ४ टीम यांनी केले.

#### कॅटेगिरीनिहाय प्रथम तीन विजेते (गाव)

**डीझेल मॉडिफाइ** : सर्जेराव कावडे (पुणे), मनोज बिरादार (विजापूर कर्नाटक), सिरीयल डिमेलो (मुंबई).

**पेट्रोल मॉडीफाड** : निखिल भडाळे (पुणे), विनायक बर्गे (कोरेगाव, सातारा) गिरीश पाटील (विजापूर, कर्नाटका) यांनी पटकावला .

**डीझेल एक्सपर्ट** : वैभव सेलूकर (पुणे), आसिफ फरास (सातारा), राज देशमुख (सातारा) .

पेट्रोल एक्सपर्ट : प्रतिकराज मोहिते (सातारा), निलेश झेंडे (पुणे), विजय जाधव (सातारा)

**एसयूव्ही** : नवीन नायडू (पुणे), कौस्तुभ नाडगोंडे (कोल्हापूर), करण पोरे (म्हसवड, सातारा)

**महिला** : मीनल शेटे (कल्याण मुंबई), कविता देसाई (विजापूर कर्नाटक).

#### टाईम रन या अडीच किलोमीटरचे विजेते

**एसयुव्ही** : करण पोरे (म्हसवड, सातारा), अमित शेटे (कल्याण मुंबई), वधीराज जोशी (विजापूर कर्नाटका)

**महिला** : कविता देसाई (विजापूर कर्नाटक), मीनल शेटे (कल्याण मुंबई).

**डीझेल मॉडिफाइड** : मनोज बिरादार (विजापूर कर्नाटक), अभय जाधवराव (कराड), निकुंज वोरा (पाचगणी महाबळेश्वर)

**पेट्रोल मॉडीफाय** : सर्जेराव कावडे (पुणे), निखील भडाळे (पुणे), गिरीश पाटील (विजापूर कर्नाटक).

**डीझेल एक्सपर्ट** : आसिफ फरास (सातारा), वैभव सेलूकर (पुणे)

## २५ लाख ८ हजार रुपयांचा निव्वळ नफा

**सासवड, दि. ३ (प्रतिनिधी)** - येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसरक मंडळ सेवकांची सहकारी पतसंस्थेला यावर्षी २५ लाख ८ हजार रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य नंदकुमार सागर यांनी दिली.

संस्थेची २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (दि. १) सासवड येथील आचार्य अत्रे सांस्कृतिक भवनात अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यावेळी पुरंदर हवेलीचे आमदार व शिक्षण संस्थेचे सचिव संजय जगताप यांनी संस्थेच्या कामकाजाचा आढावा घेत कौतुक केले. दरम्यान, संस्थापक सहकारमहर्षी स्व. चंदूकाका जगताप यांच्या प्रतिमापूजन आणि दीपप्रज्वलन तसेच श्रद्धांजली अर्पण करून सभेला सुरूवात झाली. याप्रसंगी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवड या संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, विश्वस्त महादेव रासकर, पुरंदर नागरीचे सरव्यवस्थापक अनिल उरवणे उपस्थित होते. याप्रसंगी संस्थेच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा तसेच सभासदांच्या पाल्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी रविंद्रपंत जगताप, कानिफनाथ आमराळे, राजेंद्र जाधव तसेच पतसंस्थेचे उपाध्यक्ष लिलाचंद साळवी, संचालक विठ्ठल कदम, संभाजी जगताप, सुरेश तिकोणे, मोहन निगडे, नितीन काकडे, प्रिया गायकवाड, सल्लागार प्रा उत्तम निगडे, नंदकुमार बारवकर, विजय काकडे, शिवाजीराव कोलते, मधुकर जगताप, हरीभाऊ टापरे, लक्ष्मण गोळे, मारूती झगडे, गायत्री बेलसरे, विजयकुमार हाके, विलास गंगनमले, व्यवस्थापिका श्रद्धा इभाड आदी उपस्थित होते. प्रास्ताविक व अहवालवाचन पतसंस्थेच्या सचिव हनुमंत पवार यांनी, संचालक विजय चिकणे यांनी आभार मानले.



सासवड : सभेत आमदार संजय जगताप यांनी मार्गदर्शन केले.

#### आर्थिक आढावा

**संस्थेचे भागभांडवल** : २ कोटी ६८ लाख रुपये, **ठेवी** : १ कोटी ९८ लाख रुपये, **कर्जवाटप** : ५ कोटी २८ लाख रुपये, **इतर बँकां व पतसंस्थांमधील गुंतवणूक** : २० लाख ७ हजार रुपये, **स्वनिधी** : ५० लाख ६२ हजार रुपये, **अधिकृत भागभांडवल** : १० कोटी रुपये, **सतत ऑडीट वर्ग** : अ, **सभासद संख्या** : २४२.

**Navsahyadri Education Society's Group of Institutions**
Naigaon (Nasrapur), Pune-Satara Rd, Pune-412213.
Approved by AICTE New Delhi, Recognized by Govt. of Maharashtra and Affiliated MSBTE, Mumbai.

**ADMISSIONS OPEN 2024-2025**
Applications are invited for (Vacant Seats Against CAP / Institute Level Seats)

Navsahyadri Education Society's Group of Institutions (Polytechnic) (DTE Code : 6632)

First Year & Direct Second Year Diploma Engineering

| S.No. | Courses | Choice Code |
|---|---|---|
| 1 | Civil Engineering | 663219110 |
| 2 | Computer Engineering | 663224510 |
| 3 | Information Technology | 663224610 |
| 4 | Electrical Engineering | 663229310 |
| 5 | Mechanical Engineering | 663261210 |

**Eligibility** as per DTE, Maharashtra Norms. Aspiring candidates are advised to check the College website, Notice Board, College and DTE website regularly.
Contact No: 9665875925 /9765636510 / 9860822227 / 9881325538
www.navsahyadri.edu.in Email- director@navsahyadri.edu.in
Shri. Sagar P. Suke, Group Director
Shri. P. N. Suke, President, NESGI

K.E. Society's
**RAJARAMBAPU INSTITUTE OF TECHNOLOGY**
(POLYTECHNIC), LOHAGAON, PUNE 411 047
Approved by AICTE, New Delhi recognized by D.T.E. Govt. of Maharashtra
Affiliated to the M.S.B.T.E. Mumbai

प्रवेश प्रक्रिया २०२४-२०२५ प्रथम व थेट व्दितीय वर्ष डिप्लोमा इंजिनिअरिंगसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून रिक्त राहिलेल्या संस्थास्तरांवरील जागांसाठी प्रवेश सुरु
DTE CODE- D 6456 MSBTE CODE-1227
Facility Center : ऑनलाईन प्रवेशअर्ज भरणेची सुविधा उपलब्ध
शैक्षणिक अर्हता-प्रथम वर्षा करिता १० वी पास
थेट व्दितीय वर्ष-१२ वी विज्ञान (गणित), आय.टी.आय. पास

| Sr. No. | Course Name |
|---|---|
| 1 | Diploma in Civil Engineering |
| 2 | Diploma in Computer Engineering |
| 3 | Diploma in Mechanical Engineering |
| 4 | Diploma in Artificial Intelligence (AI) and Machine Learning -AIML |

- ७९ वर्षाची समृध्द परंपरा व ४८ दर्जेदार शिक्षण संस्थाचा विस्तार
- तज्ञ व अनुभवी प्राध्यापक वर्ग
- सुसज्ज ई-ग्रंथालय
- अदयावत प्रयोगशाळा
- उत्तम निकालाची परंपरा
- शैक्षणिक फी सुलभ हत्यांमध्ये भरण्याची सोय
- हुशार व गरीब गरजु विदयार्थ्यांना शिष्युवृत्ती व सवलती
- विदयार्थ्याची राहण्याची व मेसची उत्तम सोय
- विदयार्थ्यांना बस सेवा उपलब्ध
- कॅम्पस इंटरव्ह्यू, नामांकित कंपन्यामध्ये नोकरीची संधी व व्यक्तीगत मार्गदर्शन

प्रवेशासाठी संपर्क
प्रा.राहुल कणसे : ८८३०८६३६५६
प्रा.अजिंक्य साटम : ९९६०२९२६०८
प्रा.गोपाळ पाटील : ९५०३३०८०२१
श्री.धीरज निंबाळकर: ९८९०१४७३७२